संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
22 JUL 2026
प्राप्त झाले सही.........................

**महसूल संवर्ग बदलीबाबत.**
**श्री. गोविंद निवृत्ती शिंदे,**
**सहायक संचालक.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
शासन आदेश क्रमांक:ई-१७१६३५३/कोषा. प्रशा-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-२२ जुलै, २०२६.

**शासन आदेश**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) व ४ (५) च्या तरतूदीनुसार व सक्षम प्राधिकाराच्या मान्यतेने महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सहायक संचालक संवर्गातील खालील अधिकाऱ्याची महसूल संवर्ग बदलीने विवरणपत्रातील स्तंभ क्र.५ मध्ये नमूद केलेल्या पदावर याद्वारे पदस्थापना करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व सध्याचे कार्यालय | सध्याचा कार्यरत महसूली विभाग | बदलून दिलेला महसूली विभाग | बदलीने पदस्थापनेचे पद व कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | श्री. गोविंद निवृत्ती शिंदे, सहायक संचालक (लेखा), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर. | नागपूर | पुणे | लेखा अधिकारी वर्ग-१, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे. |

२. बदली झालेल्या अधिकाऱ्याच्या सध्याच्या नियंत्रक अधिकाऱ्यांनी स्थानिक व्यवस्था करुन श्री. शिंदे यांना तात्काळ कार्यमुक्त करावे. बदलीच्या पदावर श्री. शिंदे यांनी तात्काळ रुजू व्हावे. पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील तरतूदींनुसार कारवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३. बदलीच्या ठिकाणी हजर होताच शासनास तसेच, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांना अवगत करावे.

४. श्री. शिंदे यांनी नवीन पदाचा कार्यभार स्विकारताच त्यांच्या वैयक्तिक माहितीचा तपशील HRMS मधील नमून्यात भरून नवीन कार्यालय प्रमुखांमार्फत वित्त विभाग तसेच, संचालनालय, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई या कार्यालयास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(वि. अ. धोत्रे)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

22/07/26

**प्रति,**

१. सहसचिव, मा. मुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
२. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर, *

३. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई,
४. संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण भवन, नवी मुंबई,*
५. संबंधित अधिकाऱ्यांचे सध्याचे कार्यालय प्रमुख, *
६. संबंधित अधिकाऱ्यांचे बदलीनंतरचे कार्यालय प्रमुख*
७. श्री. गोविंद निवृत्ती शिंदे, सहायक संचालक *
८. निवडनस्ती कोषा प्रशा-२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

(*संचालक, लेखा व कोषागारे, संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)